# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ११.०७.२०२६ शनिवार**

**नागपुर शहर पोलीसांची अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीमेअंतर्गत उल्लेखनिय कामगिरी :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे मार्गदर्शनाखाली नागपुर शहर पोलीसांनी जुन २०२६ मध्ये अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम प्रभावीपणे राबवुन एनडीपिएस कायद्यान्वये उल्लेखनिय यश संपादन केले. पोलीसांनी अंमली पदार्थ विक्री करणारे, सेवन करणारे तसेच, अभिलेखावरील गुन्हेगार यांचेवर सतत पाळत ठेवुन, त्यांचेवर जास्तीत जास्त प्रतिबंधात्मक कारवाई केल्या. दाखल गुन्ह्यामधील तपासात बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंक तपासुन आरोपींना निष्पन्न करून, अटक केले.


जानेवारी ते जुन २०२५ एनडीपीएस कायद्यांतर्गत एम.डी पावडर च्या ०८ केसेस ह्या व्यवसायीक अंमली पदार्थ केसेस होत्या. ज्यामध्ये एकुण १ किलो ६८० ग्राम एम.डी. पावडर जप्त करण्यात आली होती. मागील वर्षाचे तुलनेत जानेवारी ते जुन २०२६ मध्ये एनडीपिएस कायद्यांतर्गत एम.डी पावडर च्या १४ केसेस व्यवसायीक अंमली पदार्थ केसेस होत्या. ज्यामध्ये एकुण ९ किलो २५४ ग्राम एम.डी. पावडर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ज्यानुसार गतवर्षीचे तुलनेत एकुण ०६ केसेस ची वाढ असुन, वाढीचे प्रमाण ७५ टक्क्याचे जवळपास आहे.

एनडीपिएस कायद्यांतर्गत एकुण दाखल गुन्ह्यांची तुलना केली असता, जानेवारी ते जुन २०२५ दरम्यान एकुण ३५९ केसेस दाखल करण्यात आल्या होत्या. गतवर्षीचे तुलनेत जानेवारी ते मे २०२६ पावेतो एकुण १९९ केसेस दाखल होत्या. परंतु, जुन २०२६ अखेरपर्यंत एकुण ४२५ केसेस दाखल करण्यात आल्या. ज्यामध्ये गतवर्षीचे तुलनेत एकुण ६६ गुन्हे अधिक दाखल असुन वाढीचे प्रमाण १८.३८ टक्के इतके आहे.

जानेवारी ते जुन २०२५ पर्यंत एकुण १ कोटी ९४ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येवुन एकुण दाखल ३५९ गुन्ह्यामध्ये १९२ आरोपींना अटक करण्यात येवुन, १४५ गुन्हेगारांवर प्रतीबंधात्मक कारवाई केल्या होत्या. जानेवारी ते जुन २०२६ अखेर पर्यंत एकुण ६ कोटी ९३ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येवुन एकुण दाखल ४२५ गुन्ह्यामध्ये २०२ आरोपींना अटक करण्यात आले. १०२ गुन्हेगारांवर प्रतीबंधात्मक कारवाई करण्यात आल्या. तुलनात्मकरित्या गतवर्षीचे तुलनेत एकुण ४ कोटी ९९ लाख रूपये मुद्देमालाची वाढ असुन, वाढीचे प्रमाण २५७ टक्के इतके उल्लेखनिय असल्याचे दिसुन येते.

नागपुर शहर पोलीसांनी शहराला अंमली पदार्थ मुक्त करण्याचा ध्यास घेतला असुन ''ऑपरेशन थंडर'' ही विशेष मोहीम राबवुन अंमली पदार्थ विक्री करणारे, बाळगणारे, वाहतुक करणारे आणि सेवन करणारे यांचेवर सतत प्रभावी कारवाई करून, एनडीपिएस कायद्यांतर्गत जास्तीत जास्त गुन्हे दाखल केले व मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ एमडी पावडर, गांजा जप्त करण्यात यश प्राप्त केले आहे. पोलीसांनी अंमली पदार्थ विक्री चे अवैद्य साखळीवर प्रभावीपणे आघात करून, उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

नागपुर शहर पोलीस अंमली पदार्थ मुक्त समाज निर्माण करण्यासाठी कटीबध्द असुन, पुढील काळातही विशेष मोहीमा राबवुन, अंमली पदार्थ तस्करांविरूध्द कठोर कारवाई सुरूच ठेवणार आहेत.




स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.